**************************************** ISSN 2320-0197 **

# स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि आधुनिक ग्रामविकासाची दिशा

(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४६व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षीय भाषण)

**डॉ. श्रीराम कावळे**

प्र- कुलगुरू

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४६व्या वार्षिक अधिवेशनासाठी "स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि आधुनिक ग्रामविकासाची दिशा" हा विषय जाणीवपूर्वक निवडलेला आहे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असतांना विकासाचा वेग आणि ग्रामीण विकासाची दशा, रचना आणि दिशा यात विद्यापीठाची भूमिका मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

प्राचीन काळापासून खेडे हा प्रशासनाचा एकक मानला असून भारत ही ग्राम समुदायाची धरती आहे आणि पुढेही राहील. भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात आपण प्रवेश करीत आहोत. स्वतंत्र प्राप्त झाल्यानंतर देश विभाजनाच्या समस्या आणि आर्थिक अस्थिरतेशी लढत होता, शिवाय निरक्षरता, भष्ट्राचार, गरिबी, लिंगभेद, अस्पृश्यता, अंधश्रध्दा, प्रादेशिक असमतोल सांप्रदायिकता या समस्यांना सुध्दा देश तोंड देत होता. स्वातंत्र्यानंतर देशाने दुष्काळ व युध्दांचा सुध्दा सामना केला आहे. या ७५ वर्षात आपण प्रगतीचे अनेक टप्पे पार केलेले आहेत. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, मानवी विकास, महिला सक्षमीकरण इ. क्षेत्रात विविध आव्हाने स्वीकारून लक्षणीय प्रगती करीत आहे. प्रगतीच्या संकल्पना वेगवेगळ्या असल्या तरीही भारताच्या पायाभूत सुविधा, शिक्षण आरोग्यसेवा, विज्ञान व तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांमधील प्रगती कोणीही नाकारू शकणार नाही. अनेक अर्थशास्त्रज्ञ भारताच्या आर्थिक विकासाला स्वातंत्र्यानंतरची पहिली ४५ वर्षे आणि मुक्त बाजार अर्थव्यवस्थेची जवळजवळ तीन दशके अश्या दोन भागात विभागतात. आर्थिक उदारीकरणाबाबतही वेगवेगळे मतप्रवाह आहेत सन १९९१ च्या आर्थिक सुधारणांनतंर भारताच्या आर्थिक वाढीला चालना मिळाली. देशातील विदेशी गुंतवणूकीत वाढ होत असून त्याचा फायदा देशातील माहिती तंत्रज्ञान व सेवा क्षेत्राला होत आहे. एके काळी २-३% ने वाढणाऱ्या हिंदू विकास दर या नावाने ओळखल्या जाणारी भारतीय अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या (२०२२) च्या अहवालानुसार ८.२% दराने जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनली आहे. सद्यःपरिस्थितीत आपल्या शेजारील देशांच्या आर्थिक परिस्थितीशी भारताची तुलना केल्यास देशाच्या प्रगतीचा आलेख लक्षात येतो, जसे की श्रीलंका व पाकिस्तान सारखे देश आज आर्थिक दिवाळखोरीत निघाले आहेत हे आपण पाहत आहोत.

ग्राम हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलाधार आहे. अजूनही भारताची जवळपास ७०% लोकसंख्या ही खेडयांमध्ये राहते. शेती शेतमजुरी व संबंधित पूरक व्यवसाय हे खेड्यांमधील महत्वाचे व्यवसाय आहेत. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सामुदायिक विकास योजना भारतात २ ऑक्टोंबर, १९५२ पासून सुरू करण्यात आली.

त्यातील बरेच विकास कार्यक्रम शहरी जनतेसाठीच प्रामुख्याने राबविण्यात आले, शिवाय शहरी भागाच्या विकासाकरीता ग्रामीण भागातील सर्व साधन संपत्तीचा उपयोग करण्यात आला त्यामुळे शहरी व ग्रामीण विकासात तफावत निर्माण झाली आहे. वास्तविक ग्रामीण भागातील श्रमशक्तीचा योग्य वापर केल्यास ग्रामीण भागाचे परिवर्तन करणे, विकासाची प्रक्रिया गतिमान करणे कठीण नाही.

ग्राम विकासाच्या संकल्पना विविध पध्दतीने मांडलेल्या आहेत. ग्राम विकासामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाचे महत्व सद्यस्थितीमध्ये अनन्यसाधारण आहे, याचा फायदा ग्रामीण भागांना होत आहे. कृषी, दळणवळण व दूरसंचार इत्यादी क्षेत्रातील प्रगतीने ग्राम विकासाला नव्या दिशा प्राप्त झाल्या आहेत त्याव्दारे मानवी कल्याण, सामाजिक व आर्थिक परिवर्तन करणे शक्य होईल. ग्रामीण विकासाच्या आधुनिक दिशा ठरवितांना अर्थव्यवस्थेच्या पायाभूत क्षेत्राचा अभ्यास करणे आवश्यक आहे, जगातील बहुतांश देशात ग्राम विकासामध्ये शेती क्षेत्रावर अधिक भर दिला जातो.

**१. शेती :**

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करीत, कृषीप्रधान देश म्हणून भारताची प्रतिमा तयार झाली भारतीय शेतीची प्रगती काही प्रमाणात स्थिर होती. डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी देशात हरितक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. शेती क्षेत्राचा विस्तार, उच्च उत्पन्न देणारे वाण, संशोधनातील सातत्यपूर्ण गुंतवणूक, जमीन सुधारणा, कर्ज सुविधांच्या व्याप्तीचा विस्तार आणि ग्रामीण पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा हे काही इतर निर्धारक घटकामुळे देशात कृषी क्रांती घडून आली.

सद्यस्थितीत कृषी जैविक तंत्रज्ञान हे शेती क्षेत्राला नविन दिशा देत असले तरीही आधुनिक व सामूहिक शेतीबाबत भारतीय शेतकऱ्यांचा कल कमी आहे. देशात अल्प भूधारकांची संख्या बरीच असल्याने समूह शेती व इतर शेती क्षेत्रात तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अत्यावश्यक झाले आहे. केंद्र सरकारकडे उपलब्ध असलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, एकुण १,८०,८८८ हजार हेक्टर शेतजमीनीच्या तुलनेत देशातील लागवडीखालील जमीन १,५३,८८८ हजार हेक्टर आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही एकूण उपलब्ध शेतजमिनीपैकी ७१,५५४ हजार हेक्टर किंवा फक्त ४०% जमीन सिंचनाखाली आहे व ६०% जमीन ही निसर्गावर अवलंबून आहे.

देशाच्या प्रगतीसाठी कृषीला तंत्रज्ञानाशी जोडणे अत्यावश्यक आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या परस्पर सहयोगाने योजना राबविणे आवश्यक आहे. कृषी मालाच्या खरेदी आणि विक्रीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल, National Agriculture Market (e-NAM) हे केंद्र शासनाने बनवलेले इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग पोर्टल आहे जे संपूर्ण भारतातील कृषी मालासाठी एक एकीकृत राष्ट्रीय बाजारपेठ तयार करण्यासाठी सर्व विद्यमान कृषी उत्पन्न बाजार समित्यांना एकमेकांशी जोडते. याव्दारे आजपर्यंत २२ राज्य व ३ केंद्रशाशित प्रदेशांच्या बाराशे साठ बाजारपेठांना जोडण्यात आले आहे. या प्लॅटफॉर्म द्वारे २०३ प्रकारच्या वस्तूंची खरेदी विक्री होते. अशाप्रकारे तंत्रज्ञानाची सांगड घालून शेतकऱ्यापर्यंत त्यांचा माल योग्य भावात

विकण्याची सुविधा निर्माण करून देणे हे ग्रामीण भागासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

**२. बॅकींग सेवा :**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर अनेक वर्ष भारतातील बहुतांश ग्रामीण जनता बँकिंग सेवांपासून वंचित होती, त्यामुळे या जनतेकडे बचत किंवा कर्ज मिळवण्यासाठी कोणतेही संस्थात्मक मार्ग उपलब्ध नव्हते. बँकिंग सेवांपासून वंचित घटकांना आर्थिक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री जनधन योजनेची सुरूवात सन २०१४ मध्ये करण्यात आली ज्यामुळे ग्रामीण भागातील अनेक लोकांना बँकांच्या सेवा सहज उपलब्ध करून देण्यात यश मिळाले.

प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत जानेवारी २०२३ पर्यंत खात्यांची एकूण संख्या ४७.९२ कोटी पर्यंत पोहोचली आहे. यापैकी ५५.४६% (२६.५८ कोटी) जन-धन खातेधारक या महिला आहेत आणि ६६.७१% (३१.९७ कोटी) जनधन खाती ग्रामीण आणि निमशहरी भागातील आहेत, जन धन योजनेमुळे शासनाला आर्थिक समावेशनाच्या कार्यक्रमाचा एक उल्लेखनीय टप्पा गाठणे शक्य झाले आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेच्या उत्कृष्ट नियोजनामुळेच शासनाच्या थेट लाभ हस्तांतरणाच्या अनेक योजना सफल झाल्या आहेत, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या काळात तळागाळातील लोकांना बँकांशी जोडण्याचे हे कार्य भविष्याला नव्या दिशा देईल.

**३. शिक्षण** :

भारत स्वतंत्र झाल्यापासून आजतागायत शिक्षण क्षेत्रात लाक्षणिक प्रगती केली आहे. सन १९४७ मध्ये भारताची लोकसंख्या ३४ कोटी होती व साक्षरतेचे प्रमाण १२% होते आज लोकसंख्या एक दशांश चार अब्ज पर्यंत पोहोचले असून साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होऊन आता देशाची साक्षरता ७४.०४% झाली आहे. सन १९४७ मध्ये केवळ १४ विद्यापीठांपासून सध्याच्या १,०२६ पर्यंत आणि १,४०,७९४ प्राथमिक शाळांपासून आता ७,७४,७४२ पर्यंत संख्यात्मक वाढ भारतीय शिक्षण प्रणालीत झाली आहे. भारताची स्वातंत्र्योत्तर शिक्षण प्रणाली जगातील सर्वात मोठी शिक्षण प्रणाली म्हणून उदयास आली आहे. सध्या जवळपास ४० दशलक्ष तरूण उच्च शिक्षण घेत आहेत. असे असले तरीही, जेव्हा पर्यंत ग्रामीण शिक्षणाचा स्तर उंचावत नाही तेव्हापर्यंत खऱ्या अर्थाने ग्रामविकास होणार नाही. कोविड १९ महामारीच्या काळात भारतीय शिक्षण आभासी शिक्षणप्रणालीकडे वळवण्यात आले. यामुळे ग्रामीण शिक्षणाच्या दिशा बदलल्या आहेत. शैक्षणिक संसाधन सामग्रीचे डिजिटायझेशन बऱ्याच अंशी होत आहे. शहरी भागांसारख्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या समान संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे हे एक मोठे आव्हान आहे. यासाठी तंत्रज्ञान हे एकमेव माध्यम ठरू शकते. आत्मनिर्भर भारत अभियानाचा एक भाग म्हणून, PM e-VIDYA नावाचा एक व्यापक उपक्रम सुरू करण्यात आला, ज्याव्दारे सर्व डिजिटल, ऑनलाईन आणि ऑन एअर शिक्षणाचे उपक्रम सहज उपलब्ध करून देण्यात येत आहेत, या तंत्रज्ञानयुक्त शिक्षणाने ग्रामीण विद्यार्थ्यांना सर्व समावेशक शिक्षण प्राप्त होण्यास मदत होईल, त्याचबरोबर सर्वोत्कृष्ट शिक्षकांकडून अध्ययन अनुभव प्राप्त करण्याची संधी उपलब्ध होईल. यामाध्यमातून गावांना आधुनिक रूप प्राप्त होईल.

भारताने साक्षरतेमध्ये उल्लेखनिय प्रगती केली असली तरीही उच्च शिक्षणामधील गुणवत्ता हा

चिंतेचा विषय आहे. एकेकाळी भारतीय शिक्षण संपूर्ण जगात नामांकित होते परंतु सद्यस्थितीत जगातील दोनशे विद्यापीठांमध्ये 'भारताचे एकही विद्यापीठ नाही हा चिंतेचा विषय आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अमंलबजावणीची तयारी सुरू आहे यामुळे आपल्या शिक्षण प्रणालीमध्ये सकारात्मक व गुणात्मक बदल होतील अशी अपेक्षा आहे. जागतिकीकरणामुळे शिक्षणाच्या व्यापारीकरण आणि खाजगीकरणात वाढ होत आहे. जनसामान्यांमध्ये सार्वजनिक शिक्षणाबद्दल विश्वासार्यता निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. शाळा-महाविद्यालयांमधील शिक्षकांची अपुरी संख्या, पायाभूत सुविधांचा अभाव आणि प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत असमाधानकारक अध्ययन निष्पत्ती या समस्याचे निराकरण करणे हे ग्रामीण गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी महत्वाचे आहे.

**४. आरोग्य सुविधा :**

ग्रामविकासातील एक महत्वाचा घटक म्हणजे आरोग्य सुविधा होय. देशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामीण भागात आजही आरोग्याच्या सुविधा अपुऱ्या आहेत. WHO नुसार १००० लोकांमागे सरासरी २.५ डॉक्टर असायला हवेत त्या तुलनेत भारतात १००० लोकांमागे फक्त ०.७ डॉक्टर आहेत. ग्रामीण भागात ही परिस्थिती तर आणखी बिकट आहे, कोविडच्या काळात याची प्रचीती आली. आरोग्य क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या वापराचे प्रमाण आज अत्यल्प असले तरीही भविष्यात या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्य सुविधा पोहचविण्यास मदत होईल. केंद्र व राज्य सरकार पायाभूत आरोग्य सुविधा ग्रामीण भागापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. मृत्युदरामधील घट ही या क्षेत्रातील भारताच्या वाट्याला आलेली एक मोठी उपलब्धी मानली जाते. सन १९५१ मध्ये आयुर्मान अंदाजे ३७ वर्षे होते, ते वाढून सन २०११ पर्यंत ६५ वर्षे झाले आणि सन २०२२ मध्ये ते जवळजवळ दुप्पट ७०.१९ वर्षे झाले. माता मृत्यु दरातही अशीच सुधारणा दिसून येते. द हिंदू अहवालानुसार, भारतातील माता मृत्यु दर देखील सन २००७ मध्ये प्रति १००,००० जिवंत जन्मांमागे २१२ मृत्युंवरून सन २०१७-१९ मध्ये १०३ मृत्यु झाला. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यासारख्या आरोग्य क्षेत्रातील योजना बऱ्याच अंशी ग्रामीण भागातील वंचित घटकांसाठी संजीवनीच बनल्या आहेत. या योजनेच्या कार्यान्वयांनामध्ये त्रुटी असल्या तरी त्यात लाक्षणिक सुधारणा करण्याची गरज आहे, सद्यस्थितीमध्ये प्रत्येक गावात आधुनिक आरोग्य सेवा शक्य नसल्या तरीही त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष देणे गरजेचे आहे. आयुष्यमान भारत योजनेव्दारे सन २०३० पर्यंत सार्वत्रिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्देश असले तरीही ते उद्देश साध्य करणे सोपे नाही.

**५. दळणवळण :**

देशाच्या स्वातंत्र्याच्या ५० वर्षानंतरही बहुतांश ग्रामीण भाग मुख्य रस्त्यांशी जोडला गेला नाही. ग्रामीण भागांना मुख्य रस्त्यांशी जोडण्यासाठी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी २५ डिसेंबर, २००० रोजी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेची मुहूर्तमेढ रोवली. या योजनेव्दारे ग्रामीण भागांना मुख्य रस्त्यांनी जोडल्यामुळे आर्थिक व सामाजिक विकास साधने सुध्दा शक्य होईल हे या योजनेच्या अमलबजावणीतून दिसून येते.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या स्थापनेपासून, मार्च २०२२ पर्यंत, २५० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या १,५७,३७७ वस्त्यांना मंजूरी देण्यात आली आणि त्यापैकी १,५५,७१९ वस्त्यांना मुख्य मार्गाशी जोडण्यात आले. २५० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ६,२६० वस्त्यांना मंजुरी देण्यात आली आणि त्यापैकी ५,८५६ वस्त्यांना जोडणी प्रदान करण्यात आली आहे, अशा प्रकारे मार्च २०२२ पर्यंत ९९% लक्ष्यित सर्व वस्त्यांना रस्ते प्रदान करण्यात आले आहेत. असे असतांनाही आजही काही गावे रस्त्यांपासून वंचित आहेत.

**६. पायाभूत सुविधा :**

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर भारताने पायाभूत सुविधांमध्ये प्रचंड सुधारणा केली आहे. सन १९५१ मध्ये भारताच्या रस्त्यांची लांबी ०.३९९ दशलक्ष किलोमीटर होती ती सन २०२२ पर्यंत ८.०४ दशलक्ष किलोमीटर पर्यंत वाढली. स्वातंत्र्याच्या पहिल्या पंचवीस वर्षात भारताची राष्ट्रीय महामार्ग प्रणाली २४,००० किलोमीटर होती. सन २०२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय महामार्ग ९,३७६२५ किलोमीटर पर्यंत पसरले आहे. सन १९४७ मध्ये भारतामध्ये १३२६ मेगा वॅट वीज निर्मिती होत होती, ती आज वाढवून ३,९५,६०० मेगा वॅट झाली आहे. भारत आशियातला तिसरा सर्वात मोठा वीज निर्माता बनला आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर सन २०१५ मध्ये १८,४५२ गावे विद्युत पुरवठयापासून वंचित होती. परंतु प्रयत्नपूर्वक सन २०१८ पर्यंत सर्व गावांपर्यंत विद्युतपुरवठा पोहोचविण्याचे कार्य शासनाने केले तरीही आजही अनेक गावांमध्ये २४ तास वीज मिळत नाही ही वास्तविकता आहे. परंतु पुढील काळात हे लक्षही साध्य होईल अशी अपेक्षा आहे. भारतीय खेडयांना विद्युत पुरवठयासाठी सौर ऊर्जेचे उपयोग मागील काही वर्षापासून होत आहे. सौर ऊर्जेमधील भारताचे कार्य अतुलनीय आहे. सन २०१० मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय सौर मोहिम (National Solar Mission) सुरू केली, याव्दारे सौर ऊर्जेला प्रोत्साहन देऊन शाश्वत विकासाच्या दिशा निश्चित केल्या आहेत. सन २०२१ मध्ये भारत सौर ऊर्जाच्या निर्मितीमध्ये जगात चौथ्या स्थानावर पोहोचला आहे.

**७. महिला सक्षमीकरण :**

भारत स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या कारकीर्दीकडे दृष्टीक्षेप टाकल्यास असे लक्षात येते की, महिला सक्षमीकरणात बऱ्याच प्रमाणात सरकारला यश मिळाले आहे. महिलांच्या शिक्षणाच्या प्रमाणात लाक्षणिक वाढ झाली तसेच त्यापासून ग्रामीण भागही वंचित राहिलेला नाही. महिलांच्या सक्षमीकरणातच राष्ट्राचे हित सामावले आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्रातही महिला बऱ्याच प्रमाणात कार्यरत आहेत असे २०११ च्या जनगणनेतुन दिसून येते. मुद्रा योजना, बचत गट, अशा अनेक सरकारी योजनांच्या माध्यमातून महिलांचे कौशल्य व उद्योजकता विकास आणि सक्षमीकरण साध्य होत आहे.

**८. सांसद आदर्श ग्राम योजना** :

महात्मा गांधी यांनी ग्रामीण समाज आत्मनिर्भर व्हावा, गावांमध्ये कुटीर उद्योगांचा विकास व्हावा व गाव स्वावलंबी व्हावे यासाठी प्रयत्न केले. त्यांनी मक्तेदारी व भांडवलशाही व्यवस्थेचा विरोध करून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या स्वावलंबनावर अधिक भर दिला. महात्मा गांधींची हीच आदर्श गावाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी ११ ऑक्टोंबर, २०१४ रोजी भारत सरकारने सांसद

आदर्श ग्राम योजना सुरू केली, या योजनेमध्ये प्रत्येक सांसद सदस्याला एक ग्रामपंचायत दत्तक देऊन तेथील पायाभूत सुविधांचा विकास करता येईल व त्यापासून इतर गावांना प्रेरणा मिळेल. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा आदर्श गावांची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. अशा पायाभूत सुविधांचा विकास झालेली गावे आधुनिक भारताला दिशा देण्यास हातभार लावतात. सन २०२४ पर्यंत प्रत्येक लोकसभा मतदारसंघात अशी आठ आदर्श गावे निर्माण करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

ग्रामविकासाच्या योजना गावाच्या गरजांवर आधारित असायला हव्यात. यामाध्यमातूनच ग्रामविकास साध्य हाईल, तसेच ग्रामीण विकासाच्या योजना सुध्दा अद्यावत करण्याची गरज आहे. ग्रामीण रोजगार आणि कृषी उत्पादकता वाढवणे हया बाबी सुध्दा आवश्यक आहेत. शेतमालासाठी प्रगत बाजारपेठा, दळणवळणाची साधने, शेतमालाला योग्य भाव याव्दारे ग्राम विकास साध्य होईल, शिवाय शहरी व ग्रामीण ही दरी कमी होईल.

स्वांतत्र्याच्या ७५ वर्षानंतरही ग्रामीण भागामध्ये सामाजिक व आर्थिक विषमता, जातिव्यवस्था, दर्जेदार शिक्षणाचा अभाव तसेच कृषी तंत्रज्ञानाचा अपुरा हया बाबी प्रकर्षाने दिसून येतात, यामध्ये सुधारणांची गरज आहे. ग्रामीण उद्योग व्यवसायासाठी अल्पदरात कर्ज उपलब्धतेच्या बाबतीत शासनाचे प्रयत्न कौतुकास्पद असले तरी यामध्ये सुलभता आणल्यास ग्रामविकासाचा वेग वाढेल.

ग्रामीण विकासाबाबत उल्लेखनीय बाब म्हणजे विकासाची सर्वसमावेशकता आणि टिकाऊपणा आहे. जन धन योजनेसारख्या योजना ग्रामीण भारतात यशस्वी होत आहेत. हरित क्रांती आणि श्वेत क्रांतीने ग्रामीण भागाला विकासाची नवी दिशा दिली आणि तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे ग्रामीण विकासाला अधिक वेग आला. म्हणूनच जय जवान जय किसान पासून आज आपण जय विज्ञान जय तंत्रज्ञानापर्यंत पोहचण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

**९. ग्रामीण विकासात विद्यापीठाची भूमिका :**

उच्च शिक्षण मानवी विकासाचे साधन आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून रोजगाराभिमुख शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्यास ग्रामीण विकासाला मदत होईल, त्यादृष्टीने ग्रामीण व आदिवासी भागात गोंडवाना विद्यापीठाने राबवित असलेल्या रोजगाराभिमुख शिक्षणाचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**अ) एस. टी. आर. सी. नाविण्यपूर्ण उपक्रम :**

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग अर्थसहाय्यीत गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र सन २०१३ पासून गडचिरोली व चंद्रपूर क्षेत्रात कार्यरत आहे. या केंद्राच्या सहाय्याने ग्रामीण व वन प्रबळ क्षेत्रामध्ये विविध समुदायांकरिता, शेतकरी, बुरूड, मत्स्य शेतकरी, गौण वनउपज संकलक इ. तसेच शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी, उपजीविका विकास, कुशल मानव संसाधन तयार करण्याचे काम सातत्याने करीत आहे. या योजने अंतर्गत आजतागायत राबविण्यात आलेले उपक्रम यामध्ये पर्यावरण शिक्षण उपक्रम आश्रमशाळा, वैद्य चिकित्सालय, शेतकऱ्यांची मुक्त शाळा, नोंदणी उपक्रम, मोबाईल प्रात्याक्षिक युनिट, बांबू हस्तकलामध्ये महिला केंद्रीत समुदाय उपक्रम इत्यादी.

**ब) स्पार्क- ग्रामीण समाजात व्यसनांविरूध्द सामाजिक कार्यक्रम** :

नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये समाजाच्या गरजांनुसार शिक्षण व कौशल्य विकास यावर भर आहे. गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सर्वेक्षण नुसार ४१% नागरीक मद्यप्राशन व ४४% नागरीक तंबाखू सेवन अशा व्यसनाच्या आहारी गेलेले असून त्यावर दरवर्षी ३९३ कोटी रूपये खर्च होतात, अशा परिस्थितीमध्ये स्थानिक समाजामध्ये व्यसनमुक्तीवर उपाययोजना करण्याकरीता गोंडवाना विद्यापीठास आपले सामाजिक उत्तरदायित्व निभावण्यासाठी नविन शिक्षण पध्दतीत एक संधी उपलब्ध झाली.

या पार्श्वभूमीवर स्थानिक सामाजिक संस्था सर्च यांच्या सहकार्याने समाजकार्यातील एक वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम, ग्रामीण समाजात व्यसनाविरूध्द सामाजिक कार्यक्रम स्पार्क शैक्षणिक सत्र २०२२-२३ पासून सुरू करण्यात आला आहे. सदर अभ्यासक्रम काम करा, कमवा, शिक्षण घ्या या त्रैसुत्रीवर आधारित असून यामध्ये विनोबा भावे व महात्मा गांधीच्या नयी तालीम या शैक्षणिक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. सदर अभ्यासक्रमासाठी अभ्यांगतांना मासिक १०,०००/- छात्रवृत्ती देण्यात येते त्यांचे प्रशिक्षण क्षेत्र जिल्हयातील १२ तालुके व त्याअंतर्गत असणारी १५०० खेडी गावे आहेत. सदर नाविण्यापूर्ण अभ्यासक्रमामुळे अभ्यासगतांना समाजामध्ये व्यसनाबाबत प्रत्यक्ष कार्य करण्याचे कौशल्य, ज्ञानवृध्दी, क्षमताविकास तसेच आर्थिकदृष्ट्या स्वावलंबन इत्यादीचा लाभ होईल.

**क) नवसंशोधन केंद्र - ट्राईबटेक समुह उद्योजकता प्रतिष्ठान (ट्रायसेफ)** :-

गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रातील नाविण्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाच्या नवसंशोधन केंद्र अंतर्गत प्रमंडळ कलम ८, ट्रायसेफची नोंदणी करण्यात आली आहे. तसेच राज्य शासनाच्या कौशल्य विकास, उद्योजकता व रोजगार विभागाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र राज्य नाविण्यता संस्थेतर्फे पाच वर्षा करीता ५ कोटी रूपयांचे आर्थिक सहाय्यता असलेले वर्ग १ नवसंशोधन केंद्र प्रदान करण्यात आलेले आहे.

यशस्वी नवउद्योजक घडविण्याकरीता गौण वनउपज, बांबू मत्स्यपालन, पर्यटन, कृषी, वनौषधी, ड्रोन तंत्रज्ञान व पंचगाव्य अशा आट क्षेत्रीय अनुलंबाची ओळख करण्यात आलेली आहे, त्यासाठी इन्क्युबेटर तर्फे सात उपक्रम योजना सुरू करण्यात आलेल्या असून त्यामध्ये प्रामुख्याने परिक्षेत्रातील सामुदायिक सहभागातून ग्रामसभा सक्षमीकरणावर आधारित भागधारक प्रतिबध्दता कार्यक्रमाचा समावेश आहे. सद्यस्थितीत वेगवर्धक कार्यक्रम अंतर्गत ३, नवउद्योजक कार्यक्रम अंतर्गत १५, भागधारक प्रतिबध्दता कार्यक्रम अंतर्गत ४ ग्रामसभा व संलग्नित महाविद्यालयाचे १ वनौषधी आधारित नवसंशोधन केंद्र इत्यादी करीता पाठबळ देण्यात येत आहे. सद्यस्थितीत वनौषधी आध्धारित सहा हर्बल उत्पादनांची निर्मिती करून अन्न व प्रशासन विभागाची मान्यता घेण्यात आलेली असून बौध्दिक संपदा अधिकार बाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच जवळपास पंधरा पेक्षा अधिक पंचगाव्य आधारित उत्पादन तयार करण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

**ड) रोजगाराभिमुख प्रशिक्षण :**

गोंडवाना विद्यापीठाने रोजगाराला चालना देतांनाच, विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले, टैली, इकोटुरीझम या सोबतच टिसीएस आणि महिंद्रा ॲण्ड महिंद्रा सारख्या मल्टीनेशनल कंपन्याकडून ही विद्यापीठाने विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या संधी १८ एप्रिल २०२२ पासून उपलब्ध करून दिल्या, यामध्ये स्थानिक व्यापारी असोसिएशन, फार्मासिस्ट असोसिएशन सोबत सहकार्य करार करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या नवीन संधी इत्यादी.

**इ) आदिवासी गौरव प्रवास अनुभवातून नेतृत्व कार्यशाळा :**

प्राध्यापकांचा गुणात्मक दर्जा वाढविण्याकरीता रूसा तर्फे स्थापित Maharashtra State Faculty Development Academy, Pune यांचे वतीने २८ मार्च २०२२ ते ०१ एप्रिल २०२२ रोजी आयोजित पहिले एक आठवडयाचे तसेच दिनांक ०८ मार्च २०२३ ते १४ मार्च २०२३ रोजी आयोजित दूसरे एक आठवडयाचे प्रशिक्षण विद्यापीठातर्फे प्रायोजित केले होते. या "Tribal Pride Journey Experiential Leadership" या नावाने परिसरातील सर्वोत्कृष्ट सामाजिक संस्था आदिवासी व समाजातील इतर घटकांकरीता देत असलेल्या सेवा प्रकल्पाबाबत प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. त्यातून प्रत्यक्ष कार्यरत प्रकल्पाबाबत सहभागी प्राध्यापक, प्राचार्यांना अनुभव घेता आले.

**ई) एकल-ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम लोक सहभागातून ग्रामसभा सक्षमीकरण :**

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोकांचे जीवनमान उंचविण्यासाठी रोजगार निर्मिती आवश्यक आहे. गडचिरोली जिल्हयातील ७६ टक्के क्षेत्र वनाखाली आहे. एकूण वन क्षेत्रापैको एक तृतीयांश भाग सामुदायिक वन संसाधनाचा आहे. यामधून ४९ गौण वन उपज प्राप्त होतात. या गौण वन उपजांमध्ये आदिवासीचे उत्पन्न वाढविण्याची प्रचंड क्षमता आहे. वन उत्पादनाच्या संदर्भात आदिवासीमध्ये व्यावसायिक दृष्टीकोन निर्माण करून त्यासाठी पायाभूत सुविधांची निर्मिती तसेच प्रशिक्षणाची गरज आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्रामसभांच्या समन्वयातून आदिवासींचा शाश्वत विकास करण्यासाठी गौण वन उपजांच्या क्रियाकलापांशी संबंधित ग्रामसभांचे क्षमता सक्षमीकरण व प्रशिक्षण योजना गडचिरोली जिल्हयाचे मा. जिल्हाधिकारी श्री. संजय मिणा यांच्या संकल्पनेतून उदयास आली आहे.

गडचिरोली जिल्हयातील जनता मोठ्या प्रमाणात आपल्या उदरनिर्वाहाकरीता नैसर्गिक संसाधने व जैवविविधतेवर अवलंबून आहे. जिल्हयातील आदिवासी समुदायानी समृध्द जैवविविधतेच्या क्षेत्रात अनेक पिढ्यांपासून सभोवतालच्या वातावरणाशी संवाद साधून पारंपारिक पर्यावरणीय ज्ञान प्राप्त केले. यातूनच आदिवासींची संस्कृती, जीवनशैली आकारास आली. संस्कृती आणि जीवनशैलीतून आदिवासींनी जैवविविधतेचे संवर्धन केले आहे. ग्रामसभांच्या माध्यमातून जैवविविधतेचे संवर्धन करून शाश्वत विकासातून आदिवासींच्या उपजीविकेची उन्नती करणे, त्याकरीता ग्रामसभांना प्रशिक्षण देणे हा या प्रकल्पामागील उद्देश आहे. या प्रकल्पाच्या उद्देशाची पुर्तता करण्याकरीता जिल्हा प्रशासनासोबत गोंडवाना विद्यापीठ नॉलेज पार्टनर म्हणून आपली भूमिका पार पाडत आहे.

याकरीता दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजी जिल्हा प्रशासन आणि गोंडवाना विद्यापीठ, यांच्यात सामंजस्य करार घडून आला, गोंडवाना विद्यापीठाने, "गौण वन उपजांच्या क्रियाकलापांशी संबंधित ग्रामसभांचे क्षमता सक्षमीकरण व प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली.

त्यामाध्यमातून वनसंवर्धन आणि वनव्यवस्थापन करून जैवविविधतेचे संवर्धन करणे, त्यासोबतच गौण वनोपजांच्या माध्यमातून रोजगार निर्मीती करण्यास ग्रामसभांना आवश्यक प्रशिक्षण देण्याकरीता मा. कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनात गौण वन उपजांच्या क्रियाकलापांशी संबंधित ग्रामसभांचे क्षमता सक्षमीकरण व प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा आराखडा तयार केला, गोंडवाना विद्यापीठातील ग्रामसभा प्रशिक्षण केंद्राव्दारे आजतागायत ग्रामसभा प्रशिक्षणाच्या १३ बॅचचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून एकूण ७०० ग्रामसभा सदस्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे.

**उ) आदर्श पदवी महाविद्यालय :-**

गडचिरोली आणि चंद्रपूर हा वनाचा जिल्हा आहे त्यामुळे संपूर्ण वनाचे व्यवस्थापन हे महत्वाचे आहे. त्याअनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाच्या मॉडेल डिग्री कॉलेजच्या माध्यमाने वन व्यवस्थापन विषयावर पदवी अभ्यासक्रम तयार केला. ग्रामीण विद्यार्थी स्वतःच्या गावात सामुहिकरित्या वन व्यवस्थापन कौशल्याचे शिक्षण घेऊन स्वत:चा व गावाचा विकास साधणार आहे. त्यामुळे गावातील वनावर आधारीत वनोपज, यांचे व्यवस्थापन कौशल्य शिक्षण, विद्यार्थ्यांना प्राप्त होऊन विद्यार्थी रोजगाराभिमुख होतील. गडचिरोली व चंद्रपूर या जिल्हयात पर्यटनाच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असून त्यासाठी व्यावसायिकांकडे अकाउंट साभाळण्याकरीता प्रशिक्षित अकाउंटटची गरज असते ही गरज भागविण्यासाठी व विद्यार्थ्यांना या गरजेचे साधक बनवण्याचे कार्य गोंडवाना विद्यापीठाने अकाउंट ॲण्ड ऑडिटींग या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. गोंडवाना विद्यापीठाने राईस मिल असोसिएशन, केमिस्ट असोसिएशन व्यावसायिक संघटना यांच्यासोबत सामंजस्य करार केल्यामुळे या संपूर्ण अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे.

स्पार्क या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये समाजकार्याचे प्रशिक्षित विद्यार्थी व्यसनाधीन समाजाचे पुनवर्सन करण्याचे कार्य या अभ्यासक्रमातील विद्यार्थी करीत आहेत, या अभ्यासक्रमाकरीता डॉक्सर अभय बंग यांच्या सर्च या संस्थेचे सहकार्य लाभत आहेत. त्यामुळे सदर अभ्यासक्रम गोंडवाना विद्यापीठाच्या माध्यमातून स्थानिक विद्यार्थ्यांना ग्रामीण पातळीवर व्यसनाधीनतेचे पुनवर्सन करण्याकरीता व रोजगाराभिमुख समाजाकरीता सहकार्य करीत आहे.

ट्रायबल लॉ या विधी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून गडचिरोली आदिवासी जंगल व्याप्त अशा जिल्हयाच्या माध्यमातून राहणाऱ्या आदिवासी समुदायाचे कायदे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अभ्यासाकरीता उपलब्ध करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जंगलातील आदिवासी हा स्वतःच्या अधिकारापासून दूर राहणार नाही व स्वतःचे अधिकार संपादित करण्याकरीता या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून उत्प्रेरित करण्याचे कार्य सदर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी करतील.

समाजकार्य या विषयातील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजाचे प्रत्यक्ष ज्ञान देऊन विद्यार्थ्यांची समाजाप्रती दृष्टी समाजाबद्दल स्वतःच्या शिक्षणाची उपयोगिता सिध्द करण्याकरीता हवे असणारे प्रयत्न या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शिकविण्याचे कार्य गोंडवाना विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज करणार आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विविध सामाजिक संस्थामध्ये प्रत्यक्ष समाजाशी एकनिष्ठ होऊन काम करण्याची संधी ग्रामीण प्रातळीवर युवकांना उपलब्ध करून देण्याची संधी मॉडेल डिग्री कॉलेजच्या माध्यमातून गोंडवाना विद्यापीठ सातत्याने करीत आहे. याकरीता जिल्हयातील नामवंत सामाजिक संस्था विद्यापीठासोबत जुडलेल्या आहेत.

गोंडी भाषा अभ्यासक्रमाच्या माध्यमातून गडचिरोली जिल्हयांतील आदिवासी बहूल जिल्हयामध्ये शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर असतांना प्रत्यक्ष समाजाच्या योजना राबवितांना भाषेची अडचण सातत्याने येते. हा सामजिक प्रश्न डोळयासमोर ठेवून गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या घटक महाविद्यालयाने गोंडी भाषा अभ्यासक्रमाची निर्मिती केली या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रत्यक्ष कर्मचारी विद्यार्थी जो स्पर्धा परीक्षेची तयारी करतोय या विद्यार्थ्यांना सुध्दा या अभ्यासक्रमामध्ये प्रशिक्षित करण्याचे काम गोंडवाना विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज करत आहे. समाज उपयोगी या अभ्यासक्रमाने प्रचंड उत्साह विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेला आहे, इन्हेंट ॲण्ड हॉस्पिटीलिटी मॅनेजमेंट या नाविण्यपूर्ण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून पुणे मुंबई सारख्या मेट्रोपोलीटीन सिटी मध्ये लाखो रूपये खर्च करून या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता अतिशय अल्प दरात गडचिरोली विद्यापीठाच्या परिसरात मॉडेल डिग्री कॉलेजच्या माध्यमातून उपलब्ध आहे. इव्हेंट मॅनेजमेंट हा आजच्या युगातला सर्वोत्तम उच्चांक गाठणारा शब्द आहे. त्यामुळे विद्यापीठातील या अभ्यासक्रमातील विद्यार्थी हे इव्हेंट मॅनेजमेंट ची कौशल्य प्राप्त विद्यार्थी म्हणून बाहेर निघतील आणि याचा उपयोग समाजाला प्रत्यक्षदर्शी बघायला मिळेलच.

उपरोक्त सर्व घटकांसोबतच ग्रामीण विकासाच्या दृष्टीने शिक्षणाच्या ज्ञानगंगेत विद्यापीठाची भूमीका आणि रोजगाराभिमुख शिक्षणाचा आलेख मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

***